# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:26.04.2026** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या,**

- **केवायसी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी सर्व वित्तीय नियामकांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन  यांचं आवाहन.**
- **'गोदा ते नर्मदा' जलयात्रेचा श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर इथं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ.**
- **पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मन की बात मधून  देशवासीयांशी संवाद साधणार.**
- **डीआरडीओनं विकसित केलेल्या 'विक्रम VT-21' या आर्मर्ड प्लॅटफॉर्मचं अहिल्यानगरमध्ये व्हीआरडीई इथं अनावरण.**

**आणि**

- **कनिष्ठ गटाच्या विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत भारताच्या वंशिका चौधरी आणि चिराग शर्मा यांना सुवर्णपदक.**

आता सविस्तर बातम्या

**सितारामन**

केवायसी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी देशातल्या सर्व वित्तीय नियामकांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असं आवाहन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल केलं. सेबीच्या 38व्या स्थापना दिनानिमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. या कार्यक्रमादरम्यान त्यांनी सेबीच्या 'जागरूक' या गुंतवणूकदार जागृती उपक्रमाचा प्रारंभ केला. देशातले सर्व शेअर बाजार, म्युच्युअल फंड संघटना आणि इतर संस्थांच्या मदतीनं हा उपक्रम राबवला जाणार आहे.
सायबर हल्ले तसंच कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे निर्माण झालेल्या आव्हानांचा सामना करण्यासाठी सेबीनं भक्कम यंत्रणा तयार करावी, अशी सूचना त्यांनी केली.

**गोदातेनर्मदा-६२नाशिक४**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सवाचे औचित्य साधून, राज्य शासनाच्या जलसंपदा विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या, 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेचा प्रारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर इथं काल झाला. अहिल्यादेवींचे विचार, वारसा आणि विकास हा त्रिसूत्री मंत्र घेऊन ही यात्रा सुरू झाली आहे. कार्यक्रमाला मंत्री छगन भुजबळ, राधाकृष्ण विखे पाटील, गिरीश महाजन, इंदूर संस्थानचे श्रीमंत युवराज महाराज यशवंतराव होळकर, यांच्यासह अन्य मान्यवर  उपस्थित होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या जलव्यवस्थापनातील योगदानाचं यावेळी

मुख्यमंत्र्यांनी स्मरण केलं. छत्रपती शिवाजी महाराज आणि अहिल्यादेवी यांच्यासारख्या महान व्यक्तींच्या विचारांच्या आधारेच शाश्वत विकास साधता येईल, असंही ते म्हणाले.

इंट्रो-नदीजोड

नदी जोड प्रकल्पाच्या माध्यमातून राज्याला दुष्काळमुक्त करण्याचा निर्णय शासनानं घेतला असून येत्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्तानं निर्मळ आणि अविरल गोदावरीसाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. ते म्हणाले...

Byte-CM-NADIJOD-PRAKALP

त्र्यंबकेश्वर आणि चौंडी इथून दोन यात्रा सुरू होत असून मध्य प्रदेशातील माहेश्वर इथं नर्मदातीरी समारोप होणार आहे असं विखे पाटील यांनी सांगितलं. ही जलयात्रा २५ एप्रिल ते २९ एप्रिल या कालावधीत महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातील विविध जिल्ह्यांतून प्रवास करणार आहे. यात्रेत सुमारे ५०० जलयात्री, वारकरी आणि तरुण सहभागी झाले आहेत.

**चौंडीजलयात्रा-34अहिल्यानगर-04**

जामखेड तालुक्यातील श्रीक्षेत्र चौंडी इथंही ‘गोदा ते नर्मदा’ यात्रेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

**शिरपूर-मुख्यमंत्री-४९धुळे४**

धुळे जिल्ह्यातील शिरपूर इथल्या तपन भाई मुकेश भाई पटेल मेमोरियल हॉस्पिटल आणि श्री विलेपार्ले केळवणी मंडळ संचलित विविध शैक्षणिक संस्थांसह औद्योगिक उपक्रमांचं उद्घाटन काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलं. या प्रकल्पांमुळे शिरपूर परिसरातील नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा मिळतील आणि परिसराच्या विकासाला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. शिरपूर तालुक्यातील दहिवद इथल्या एस. व्ही. के. एम. कॉलेज ऑफ इंजीनियरिंगचं उद्घाटनही फडणवीस यांनी केलं. यावेळी धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

**समिती-मुंबई**

राज्यातल्या भटके-विमुक्त समाजाच्या समस्या सोडवण्यासाठी तसंच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्रिस्तरीय समित्यांची स्थापना केल्याची माहिती, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी पत्रकाद्वारे दिली.

राज्यस्तर, जिल्हास्तर आणि उपविभाग स्तरावरच्या या समित्यांच्या माध्यमातून भटके-विमुक्तांच्या तक्रारींचं निवारण तातडीने केलं जाईल, त्वरित कारवाई केली जाईल तसंच शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जाईल असं सावे यांनी म्हटलं आहे.

या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात....

**मनकीबात-पूल-संध्या**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरील मन की बात या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १३३ वा भाग असेल. त्याचं प्रसारण आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, एआयआर न्यूज या संकेतस्थळावर आणि न्यूज ऑन एआयआर या मोबाईल ॲपवर केलं जाणार आहे. त्याचप्रमाणे AIR न्यूज, डीडी न्यूज तसंच पंतप्रधान कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब वाहिन्यांवरून हा कार्यक्रम प्रक्षेपित होईल.

**नीतीआयोग**

नीती आयोगाच्या उपाध्यक्षपदी अशोक कुमार लाहिरी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नीती आयोगाची पुनर्रचना करण्यात आली असून  सदस्यपदी राजीव गौबा, के. व्ही. राजू, गोवर्धन दास, अभय करंदीकर आणि डॉ. एम. श्रीनिवास यांची निवड झाली आहे.
लाहिरी यांनी काल नवी दिल्लीत पंतप्रधानांची भेट घेतली. यावेळी पंतप्रधानांनी लाहिरी आणि इतर सदस्यांच्या नियुक्तीबद्दल शुभेच्छा दिल्या.

**रणगाडा-35अहिल्यानगर**

संरक्षण संशोधन विकास संस्था म्हणजेच DRDO आणि वाहन संशोधन आणि विकास प्रतिष्ठान म्हणजेच VRDE यांनी संयुक्तपणे विकसित केलेल्या ‘विक्रम VT-21’ या ट्रॅक्ड आणि व्हील्ड अशा दोन्ही प्रकारांतील अत्याधुनिक आर्मर्ड प्लॅटफॉर्मचं अनावरण काल अहिल्यानगर इथल्या व्हीआरडीईमध्ये करण्यात आलं. डीआरडीओचे अध्यक्ष डॉ समीर कामत यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. एकच वेळी क्षेपणास्त्र आणि लष्करी जवान अशा दोघांनाही वाहून नेण्याची क्षमता या वाहनांमध्ये आहे. अवघ्या तीन वर्षांमध्ये या दोन वाहनांची निर्मिती करण्यात आली असून ती सध्या प्रायोगिक तत्त्वावर केली आहे. भविष्यात लष्करामध्ये आवश्यक असलेले बदल आणि आवश्यक साधनांच्या वापरासाठी या वाहनांची निर्मिती केली जाणार आहे. भारत फोर्ज आणि टाटा ॲडव्हान्स सिस्टिम्सच्या सहकार्याने या वाहनांची निर्मिती करण्यात आली आहे. ‘विक्रम VT-21’ या आर्मर्ड प्लॅटफॉर्ममुळे देशाच्या संरक्षण क्षमतेत मोठी भर पडली असून आत्मनिर्भर भारत उपक्रमालाही मोठी चालना मिळाली आहे.

**निवडणूक**

वैद्यकीय परिषदेवरील नऊ सदस्यांच्या निवडीकरिता आज निवडणुका होणार आहेत. या निवडणुकीसाठी ६० उमेदवारांनी अर्ज दाखल केले असून सुमारे १ लाख ४० हजार मतदार मतदानाचा हक्क बजावतील. येत्या २९ एप्रिल रोजी मतमोजणी होणार आहे.

**वाढवणप्रकल्प-25पालघर4**

वाढवण प्रकल्पासाठी जमीन अधिग्रहणाबाबत आलेल्या प्रत्येक तक्रारीची गांभीर्यानं दखल घेतली जात असून कोणत्याही गैरप्रकाराविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल असं पालघर जिल्हा प्रशासनानं स्पष्ट केलं आहे नागरिक आणि  माध्यमांनी या संदर्भात चिंता व्यक्त केली होती. प्रत्येक अर्जाची काटेकोर छाननी केली जात आहे. आणि प्रक्रियेत फेरफार करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल," असं जिल्हाधिकारी डॉ. इंदू राणी जाखर यांनी सांगितलं. आतापर्यंत प्रशासनाने ६२ हेक्टर जमीन अधिग्रहित केली असून २६१ भूधारकांना नुकसानभरपाई देण्यात आली आहे.

**हिवतापदिन-४८धुळे४**

धुळे महानगरपालिकेच्यावतीनं काल जागतिक हिवताप दिनानिमित्त  जनजागृती फेरीचं आयोजन करण्यात आले. महापौर मायादेवी परदेशी यांनी या फेरीला हिरवा झेंडा दाखवला. या फेरीदरम्यान हिवताप आजाराबद्दल  जनजागृती करण्यात आली आणि समारोप प्रसंगी उपस्थितांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली. छत्रपती संभाजीनगर इथंही महानगरपालिका आणि जिल्हा हिवताप कार्यालयाच्या संयुक्त विद्यमानं जनजागृती फेरी काढण्यात आली. यावेळी हिवताप निर्मुलनात ऊत्कृष्ट काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सत्कार  करण्यात आला. त्यानंतर उपस्थितांनी मलेरिया आणि इतर किटकजन्य आजारांपासून बचावासाठी शपथ घेतली.

कोल्हापूरमध्ये आशा स्वयंसेविकांनी डासांपासून होणारे आजारांविषयी पथनाट्य सादर करून जनजागृती केली.

**नेमबाजी**

इजिप्तमध्ये कैरो इथं सुरू असलेल्या कनिष्ठ गटाच्या नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत भारतीय खेळाडू दमदार कामगिरी करत आहेत. १० मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक प्रकारात वंशिका चौधरी आणि चिराग शर्मा यांनी सुवर्ण पदकांची कमाई केली तर मोहिनी सिंह आणि हिमांशु राणा यांना कास्य पदक मिळालं. आत्तापर्यंत ५ सुवर्ण, 5 रौप्य आणि 4 कांस्य पदकांसह भारताची एकंदर पदक संख्या १४ झाली आहे. भारत पदकतालिकेत अव्वल स्थानावर आहे.

**हवामान**

येत्या दोन दिवसात विदर्भात उष्णतेची  लाट येईल असा इशारा हवामान विभागानं  दिला आहे. कोकणात हवामान उष्ण आणि दमट राहील तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**शेवटी पुन्हा ठळक बातम्या**

- **केवायसी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी सर्व वित्तीय नियामकांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन  यांचं आवाहन**
- **‘गोदा ते नर्मदा’ जलयात्रेचा श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर इथं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ**
- **पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मन की बात मधून  देशवासीयांशी संवाद साधणार**
- **डीआरडीओनं विकसित केलेल्या ‘विक्रम VT-21’ या आर्मर्ड प्लॅटफॉर्मचं अहिल्यानगरमध्ये व्हीआरडीई इथं अनावरण**

**आणि**

- **कनिष्ठ गटाच्या विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत भारताच्या वंशिका चौधरी आणि चिराग शर्मा यांना सुवर्णपदक**

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**